दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.134

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता बांधकाम विभागासाठी आर्किटेक्ट इंजिनियर पॅनेल यांची नेमणूक करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगर अभियंता यांची दिनांक 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता बांधकाम विभागासाठी आर्किटेक्ट इंजिनियर पॅनेल यांची नेमणूक करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) चौगुले असोशिएट्स प्रो.प्रा.प्रमोद महादेव चौगुले अंदाजपत्रकीय दराचे 2.500 %जादा दराने

2) श्री.मधुकर वसंतराव गोसावी अंदाजपत्रकीय दराचे 2.180 %जादा दराने

3) विठ्ठल रामचंद्र पाचकवडे अंदाजपत्रकीय दराचे 2.120 %जादा दराने

4) नंदकुमार वसंतराव बसुगडे अंदाजपत्रकीय दराचे 3.120 %जादा दराने

5) चंद्रकांत वसंतराव पाटील अंदाजपत्रकीय दराचे 2.120 %जादा दराने

उपरोक्त ई निविदापैकी सर्व निविदाधारक यांचे दर जादा आहेत. शासननिर्णय क्र.संकीर्ण 2018/प्र.क्र.54/नवि-16 दि.04/06/2018 नुसार 2% दर अनुज्ञेय आहे. उपरोक्त निविदाधारक यांना वाटाघाटीसाठी लेखी पत्र दिले असता चौगुले असोशिएट्स प्रो.प्रा.प्रमोद महादेव चौगुले, श्री.मधुकर वसंतराव गोसावी, विठ्ठल रामचंद्र पाचकवडे, चंद्रकांत वसंतराव पाटील यांनी शासन निर्णयानुसार 2% प्रमाणे काम करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र दिले आहे. तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सदर चार निविदाधारकांना विटा नगपरिषद बांधकाम विभागाकडील विकास कामासाठी आर्किटेक्ट इंजिनियर पॅनेलवर नियुक्तीस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.135

विषय – विटा नगपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी SWM अंतर्गत मशनरी/ प्लांट खरेदी , पुरवठा करणे व बसविणे तसेच चाचणी करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 15/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी SWM अंतर्गत मशनरी/ प्लांट खरेदी , पुरवठा करणे व बसविणे तसेच चाचणी करणेकामी खालील ई निविदा दाखल आह

| | | |
|---|---|---|
| 1) | अॅडव्हांसड रेन्युवेबल एनर्जी | अंदाजपत्रकीय दराचे -0.999 %कमी दराने |
| 2) | विशाखा सिव्हील अॅण्ड इन्व्हारोमेंटल इंजिनियरींग | अंदाजपत्रकीय दराने |
| 3) | तुळसीराम इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराचे -0.990 %कमी दराने |

उपरोक्त ई निविदापैकी अॅडव्हांसड रेन्युवेबल एनर्जी यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 136

विषय – विटा नगपरिषद हद्दीतील खानापूर रोड मार्केट यार्ड येथील स्मशानभुमी मध्ये दोन नग शवदाहिनी बसविणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 15/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगपरिषद हद्दीतील खानापूर रोड मार्केट यार्ड येथील स्मशानभुमी मध्ये दोन नग शवदाहिनी बसविणेकामी खालील निविदा दाखल आह

| | |
|---|---|
| 1) इको ग्रीन सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, विटा | प्रति नग दर र.रू.1,38,000/- |
| 2) राजहंस एंटरप्रायजेस, विटा | प्रति नग दर र.रू.1,30,000/- |
| 3) पार्वती ट्रेडर्स, विटा | प्रति नग दर र.रू.1,40,000/- |

उपरोक्त निविदापैकी राजहंस एंटरप्रायजेस, विटा यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 137

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी हार्डवेअर साहित्य खरेदी करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी हार्डवेअर साहित्य खरेदी करणेकामी खालील ई निविदा दाखल आह

1) अभयसिंह सुभाष जाधव
2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
3) सुहेल सलिम तांबोळी

उपरोक्त ई निविदापैकी सुहेल सलिम तांबोळी यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 138

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी पी.व्ही.सी. साहित्य खरेदी करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी पी.व्ही.सी.साहित्य खरेदी करणेकामी खालील ई निविदा दाखल आह

1) अभयसिंह सुभाष जाधव
2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
3) सुहेल सलिम तांबोळी

उपरोक्त ई निविदापैकी सुहेल सलिम तांबोळी यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत.परंतु सदर निविदाधारकास वाटाघाटीसाठी लेखी पत्र दिले असता त्यांनी अॅटम नं.1.67 ते 1.70 या चार अॅटमचे दर वाटाघाटीअंति कमी केले आहेत. तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 139

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षासाठी विटा नगरपरिषदेच्या विविध विकास कामाबाबत ठेकेदारांचे GST/TDS/EPF/PT payments & Returns शासनास भरणा करणे,लेख्यांचे Double Accounting System नुसार Balance Sheet तयार करणे तसेच नगरपरिषद कर्मचारी यांचे आयकर भरणे व रिटर्न दाखल करणे इत्यादी कामे करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षासाठी विटा नगरपरिषदेच्या विविध विकास कामाबाबत ठेकेदारांचे GST/TDS/EPF/PT payments & Returns शासनास भरणा करणे,लेख्यांचे Double Accounting System नुसार Balance Sheet तयार करणे तसेच नगरपरिषद कर्मचारी यांचे आयकर भरणे व रिटर्न दाखल करणे इत्यादी कामे करणेकामी खालील निविदा दाखल आह

| | |
|---|---|
| 1) एच.ए.शिकलगार अॅण्ड को.चार्टड आकांऊटंट | र.रू. 6,99,000/- |
| 2) टीटीएस.अॅण्ड असोसिएटस चार्टड आकांऊटंट | र.रू. 7,10,000/- |
| 3) एस.एम.सय्यद अॅण्ड को. | र.रू. 7,25,000/- |

उपरोक्त निविदापैकी एच.ए.शिकलगार अॅण्ड को.चार्टड आकांऊटंट यांचे निविदेतील दर कमी असले तरी मागील मंजूर दरा पेक्षा जादा असलेने संबंधीत निविदाधारकास वाटाघाटीसाठी लेखी पत्र दिले असता त्यांनी र.रू.4,99,000/- दराने करणेस तयार असलेबाबत लेखी पत्राने कळविले आहे. तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 140

विषय – स्वच्छ भारत अभियान (ना.) 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेसाठी मैला शुध्दीकरण केंद्र बांधणे (STP) आणि वळविलेल्या नाल्यांचे बांधकाम आणि वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन अंतर्गत संलग्न कामे करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 15/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ भारत अभियान (ना.) 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेसाठी मैला शुध्दीकरण केंद्र बांधणे (STP) आणि वळविलेल्या नाल्यांचे बांधकाम आणि वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन अंतर्गत संलग्न कामे करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) WTE INFRA PROJECTS PVT LTD अंदाजपत्रकिय दरापेक्षा 15.01% जादा दराने

2) A G CORPORATION अंदाजपत्रकिय दरापेक्षा 22.25% जादा दराने

3) SPD INFRA PROJECTS PVT LTD अंदाजपत्रकिय दरापेक्षा 19.99% जादा दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदांचे वित्तीय बोलीचे तुलनात्मक दरपत्रक, कार्यालयीन अहवाल पाहता, महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965चे कलम 317 (3) अन्वये प्राप्त अधिकारानुसार रकाना क्रमांक 6 मध्ये दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.01 टक्के जादा दराने निविदा भरलेली आहे. तरी सदर भरलेल्या निविदेच्या दराबाबत तडजोडीअंती संबधीत ठेकेदाराने निविदा रक्कमेच्या 9.99% जादा दराने देकार कळविला आहे. सदर निविदाधारक यांना मंजूरीची समज देवून नियमानुसार होणारे रक्कमेचे स्टॅम्प पेपरवर रितसर करारपत्र करून कार्यादेश देणेत यावेत. त्यानुसार मंजूर दराप्रमाणे कामे करून घेणेस व त्याची होणारी बीले अदा करणेस तसेच याकामी होणारे सर्व अनुषंगिक खर्चास शासन निर्णय क्रमांक एमयुएन-2016/प्र.क्र.468/नवि18, दि. 20 मे 2022 अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, 1965 च्या (1965 चा महा. 40) कलम 340 च्या पोट-कलम (2) मधील उप नियम (इ) खंड (1) व्दारे प्रदान केलेल्या अधिकाराने विटा नगरपरिषद, विटाचा प्रशासक म्हणून यास मान्यता देणेत येत आहे. तसेच या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मुख्याधिकारी यांना प्रधिकृत करणेत येत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा